## प्रेसनोट दिनांक ०३/०३/२०१९

## विमानतळ पोलीस स्टेशन पुणे शहर

## विमानतळ पोलीस स्टेशन येथील पोलीसांनी मिंट हॉटेल, साकोरेनगर, विमाननगर पुणे येथे छापा टाकुन २ आरोपींच्या ताब्यातुन २ महिलांची वेश्या व्यवसायातुन सुटका करुन उत्कृष्ठ कामगिरी केले बाबत.

---

दिनांक ०२/०३/२०१९ रोजी विमानतळ पोलीस स्टेशन पुणे येथील पोलीस शिपाई ७४१९ स्वप्नील जाधव यांना त्यांचे बातमीदारांकडुन बातमी मिळाली की, इसम नामे-१.गणेश,रेणू नेपाली आणि ३.विशाल हे लोक परदेशी मुलींना आणुन विमाननगर भागात गि-हाईकांना मुलीस दाखवुन वेश्या गमनाचा व्यवहार ठरवुन वेश्या व्यवसाय करुन घेत आहेत. अशी खात्रीशिर बातमी मिळाल्याने त्यांनी सदरची बातमी वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री राजेंद्र पाटील व पोलीस निरीक्षक गुन्हे श्री बळवंत मांडगे यांना सांगितली असता त्यांनी पोलीस स्टेशन येथे हजर असलेले सपोनि श्री खोकले, पो.शि. ७४१९ जाधव, पोलीस नाईक १९५१ संकपाळ, महिला पो ना ६२५७ पवार, मपोशि९४७८ नाईक,पो.शि.६६१६मोटे,पो.ना.१७९ शिवले यांना कार्यालयात बोलावुन घेवुन बातमीचा आशय कळवुन सदर ठिकाणी छापा कारवाई करणेचे आदेश देवुन पो शि.७४१९ जाधव यांना बनावट गि-हाईक आणि एक महिला पंच व एक पुरुष पंच बोलावुन घेण्यास सांगितले असता त्यांनी एक बनावट गि-हाईक व पंचांना बोलावुन घेतले असता वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री राजेंद्र पाटील यांनी त्यांना बातमीचा आशय थोडक्यात समजावुन सांगुन सदर ठिकाणी जावुन छापा कारवाई करावयाची असल्याचे सांगितले असता पंचांनी व बनावट गि-हाईक यांनी त्यास संमती दिल्याने सहा.पोलीस निरीक्षक खोकले यांना रेडींग पार्टी तयार करण्यास सांगितले हसता वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री राजेद्र पाटील यांनी बनावट गि-हाईक करण्यास सांगितले असता त्यांनी रेडींग पार्टी तयार करुन रेड साठी लागणारे साहित्य तयार केलेनंतर बनावट गि-हाईक भावेश दिपक माचरे यांना वेश्या व्यवसायातील एजंट यांचे मोबाईलवर फोन करुन,वेश्या गमना करीता मुलगी मिळेल काय ? शॉर्ट टाईमचा रेट काय आहे, मुलगी कोठे मिळेल वगैरे माहिती विचारणे बाबत सांगितले. त्याप्रमाणे बनावट गि-हाईक यांनी त्यांचा मोबाईल नंबरवरुन एजंट याचा मोबाईल नंबरवर फोन करुन पंचासमक्ष माहिती घेतली की,सदर एजंटने वेश्या गमनासाठी शॉर्ट टाईम साठी परदेशी मुलगी मिळेल, त्यासाठी मुलीकडे ५,०००/- रुपये द्यावे लागतील असे सांगून हॉटेल बुक करुन लोकेशन पाठविणेसाठी सांगितले आहे अशी माहिती बनावट गिहाईकाने सांगितली. तसेच बनावट गिहाईक याने वेश्या व्यवसायातील एजंट यांना फोन करुन पंचासमक्ष माहिती घेतली व आम्हांस कळविले की, सदर एजंटने वेश्या गमनासाठी शॉर्ट टाईम साठी इंडियन मुलगी मिळेल, त्यासाठी तिच्याकडे ३०००/- रुपये द्यावे लागतील असे सांगून हॉटेल बुक करुन लोकेशन पाठविणेसाठी सांगितले आहे अशी माहिती बनावट गिहाईकाने सांगितली. सदर एजंट हे वेश्या व्यवसाय चालवित असल्याची पोलीस अधिकारी/ कर्मचारी आणि पंचाची खात्री झाली.त्यानंतर मा.वपोनि,राजेंद्र पाटील यांनी सदर कारवाईकामी आम्हांस विमाननगर भागामध्ये एक हॉटेल बुक करण्यासाठी सांगितले. त्याप्रमाणे सदर कारवाईकामी आम्ही सिंकोरेनगर, विमाननगर पुणे येथे रुम नं.२००२ हि किरण मासळकर या नावाने बुक केली. त्यानंतर सदर कारवाईकामी पंचाचे समक्ष बनावट गि-हाईक याचेकडे रु. ५०००/- रुपये त्यामध्ये २००० रुपये दराच्या २ नोटा व ५०० रुपये दराच्या २ नोटा त्यांचे यांचे नंबर नोंदवुन घेवुन,त्या नोटा बनावट गि-हाईक याचेकडे देवुन त्यास वेश्या गमनासाठी मुलगी मिळाल्यानंतर पो.शि.स्वप्नील जाधव यांचे मोबाईल नंबरवर मिस कॉल देऊन इशारा करणेबाबत बनावट गि-हाईकास सुचना देवुन खाजगी वाहनाने पहाटे ०४/०० वाजता रवाना केले.

त्यानंतर वपोनि.राजेंद्र पाटील, पो.नि.गुन्हे,बळवंत मांडगे, सपोनि खोकले व उपरोक्त पोलीस कर्मचारी तसेच पंच असे पंचनाम्या कामी आवश्यक ते साहित्य तसेच लॅपटॉप प्रिंटर इत्यादी घेऊन खाजगी वाहनाने निघुन वाहने डॅा.लाल पॅथालॉजी लॅबचे अलीकडे वाहने पार्क करुन साकोरेनगर,विमाननगर पुणे येथे वेग-वेगळया टीम तयार करुन बनावट गि-हाईकाचे इशा-याची वाट पाहत थांबलो. काही वेळाने बनावट गि-हाईकाने त्यांना दिलेल्या सुचना प्रमाणे पो.शि.स्वप्नील जाधव यांचे मोबाईलवर मिस कॉल देऊन इशारा केल्यांने पोलीसांनी हॉटेल मध्ये रुम नंबर २००२ येथे पहाटे ०५/०० वा.चे सुमारास छापा कारवाई करुन परदेशी महिला,वय-३२ वर्षे रा.उजबेकिस्थान.सध्या रा.साधुवासवाणी चौक,पुणे हिस ताब्यात घेण्यात आले. तसेच सदरवेळी कारवाई चालू असताना,सदर हॉटेल मध्ये एक महिला आली. तिच्याकडे महिला पंचासमक्ष वपोनि . राजेंद्र पाटील यांनी स्वतःची ओळख सांगून पंच व पोलीस स्टाफची ओळख करुन देऊन,एक महिला,वय-३० वर्षे,रा.किशननगर,ठाणे मुळगांव-जिल्हा-नागांव,आसाम असे असल्याचे सांगितले. तिच्याकडे महिला पंच व पोलीसांकरवी अधिक चौकशी करता तिने सांगितले की,मला वेश्या व्यवसायासाठी एजंट यांनी सदर हॉटेलचे रुम नं.२००२ मध्ये जाण्यासाठी सांगितले होते. वेश्या गमनासाठी आलेल्या ग्राहकाकडून शॉर्ट टाईमसाठी ३,०००/- रुपये घेण्यासाठी त्याने मला सांगितले होते. वेश्या व्यवसायातून मिळणारी अर्धी रक्कम महिला एजंट हि माझ्याकडून घेत असते अशी हकिकत सदर महिलेने सांगितली. तिच्याकडे असलेल्या पर्सची पंचासमक्ष पाहणी करता त्यामध्ये एक विवो कंपनीचा मोबाईल फोन व तिचे आधार कार्ड हे मिळून आले,ते पंचासमक्ष पो.नि.गुन्हे,बळवंत मांडगे यांनी ताब्यात घेतले. सदर पिडीत महिलेला महिला पोलीस कर्मचारी यांचे ताब्यात देण्यात आले. त्यानंतर पिडीत मुलगी हिला वपोनि.राजेंद्र पाटील यांनी तिचे एजंटला फोन करण्यास सांगितले असता, सदर पिडीत मुलीने तिचे मोबाईलवरुन विशाल यावर फोन केला असता,त्याने विशाल निरमळ या इसमाचा फोन नंबर हा देऊन वाकड,पुणे येथे येण्याबाबत सांगितले. विशाल निरमळ याचे मोबाईल फोन केला असता, त्याने प्रतिभा मोटर्स,भूमकर चौक,वाकड पुणे येथे येण्यास सांगितले. त्यानंतर सदर ठिकाणी पिडीत महिलेस पोलीस पार्टी रवाना करुन भुमकर चौकात जावुन तेथुन आरोपी विशाल महादू निरमळ,वय-२६ वर्षे,रा.महालक्ष्मी मंदिराजवळ,केशवनगर,सांगवी रोड, वडगाव मावळ,पुणे ५)कृष्ण प्रकाश नायर,वय-३२ वर्षे,रा.भुमकर चौक,काळेखडक,भारत पेट्रोल पंपाजवळ,वाकड,पुणे यांना ताब्यात घेण्यात आलेले असुन त्यांनी ताब्यात घेतलेले पिडीत परदेशी महिला आणि आसाम राज्यातील पिडीत महिला यांचेकडुन नेपाळी यांचे सांगणेवरुन वेश्या व्यवसाय करुन घेत असल्याची कबुली दिल्याने त्यांचेकडुन रुपये २,६०,५००/- ची टाटा इंडीगो कार, मोबाईल हॅन्डसेट असा माल हस्तगत करण्यात आलेला असुन त्यांचे विरुध्द विमानतळ पोलीस स्टेशन पुणे येथे गुन्हा रजि नंबर १०७/२०१९,अनैतिक व्यापार प्रतिबंध अधिनियमचे कलम ३,४,५ भा.दं.वि. कलम ३७०,३७०(अ) दाखल करण्यात आलेला असुन,दाखल गुन्हयाचा तपास पोलीस निरीक्षक गुन्हे बळवंत मांडगे विमानतळ पोलीस स्टेशन पुणे हे करीत आहेत.

**(बळवंत मांडगे)**
**पोलीस निरीक्षक,(गुन्हे)**
**विमानतळ पोलीस स्टेशन पुणे शहर**